REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 3 | DECEMBER - 2021

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रियांच्या शिक्षणाविषयीचे योगदान

प्रा.डॉ.संजय जिभाऊ पाटील
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख, क्रांतिवीर नवलभाऊ कला महाविद्यालय,
नवलनगर,ता.जि.धुळे.

## प्रास्ताविक :



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा स्त्रीवादी विचारांवर पडलेला प्रभाव व त्यातून निर्माण झालेली समाजपरिवर्तनाची चळवळ ही विसाव्या शतकात अतिशय महत्वपूर्ण अशी चळवळ होती. डॉ.आंबेडकरांनी शोषीत स्त्रीयांबरोबरच भारतातील बहुजन स्त्रीयांविषयी आपली भूमिका स्पष्ट केली होती. त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून चळवळ उभारुन स्त्रीयांना मानसन्मानाचे स्थान मिळवून देण्यात सर्वात महत्वपूर्ण भूमिका बजावली होती. परंपरागत समाजव्यवस्था व हिंदुधर्मशास्त्राने स्त्रीयांना ज्ञानसंपादनाचा अधिकार नाकारला होता. हिंदु धर्मव्यवस्थेने स्त्रीला विश्वासास अपात्र,दृष्ट,चंचल, अविचारी आणि गौण मानले होते. स्त्री ने शिक्षण घेणे म्हणजे समाजाच्या दृष्टीने भ्रष्टाचार मानला जात होता. एवढेच नव्हे तर स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे अकाली वैधव्य समजले जात होते. अगदी स्त्रीयांनी पायात चपला घालणे सुद्धा अधर्म मानला जात होता. वयाने मोठया असलेल्या व्यक्तीसमोर पतीशी वा अन्य पुरुषाशी बोलणे देखील असभ्यपणा समजला जात होता. स्त्री च्या बुद्धीने वागणे म्हणजे सर्वनाश असाच समज होता. स्त्रीला ज्ञान देणे म्हणजे वेडयाच्या हाती कोलीत देण्यासारखेच आहे असा त्या काळी समज होता. थोडक्यात भारतीय समाजव्यवस्थेत धर्म आणि परंपरा यांनी स्त्रीयांना पूर्णपणे गुलाम बनविले होते. तेंव्हा मानवतेला अपमानीत करणारी आणि संपूर्ण देशालाच दुबळी करणारी अन्यायकारक समाजव्यवस्था जर उलथवून पाडावयाची असेल तर शिक्षण हे क्रांतीचे पहिले पाऊल आहे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. म्हणुनच त्यांनी स्त्रीयांच्या शिक्षण विषयक विचारांना चालना देऊन भारतीय स्त्रीयांना शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे महान कार्य केले. त्याचा अल्पसा शोध प्रस्तुत शोधनिबंधातून घेण्यात आला आहे.

## समाजाच्या समतोल विकासासाठी शिक्षणाची आवश्यकता:

भारतीय समाजरचना मानवतेला अपमानीत करणारी आणि देशाला दुबळे करणारी अशी बनली होती. या समाज रचनेत जर अमुलाग्र बदल घडवून आणावयाचा असेल तर त्यासाठी शिक्षण हे महत्वपूर्ण ठरेल असे बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. त्यामुळेच त्यांनी 'शिका' पासून सुरुवात केली. कारण संघटनही त्याशिवाय नाही आणि संघर्षही नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणुस हीनबल होऊन जीवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो' त्यामुळे शिक्षणापासून त्यांनी आपल्या समाजकार्याला प्रारंभ केला. शिक्षण घेण्याचा अधिकार सर्वांना आहे. शिक्षण घेण्याची क्षमता प्रत्येकात आहे कोणीही जन्मत: बुद्धीमान नसतो. शिक्षणाने बुद्धिचा विकास होतो. केवळ संधी मिळण्याची अपेक्षा असते. मुलीला शिक्षणाची संधी मिळाली तर ती ही स्वत:ची पात्रता निश्चितपणे सिद्ध करु शकेल. त्याकरिता समाजातील प्रत्येक मुलीने शिक्षण घेतले पाहिजे. मुलींना शिक्षण नाकारले तर देशातील ५०% समाज अशिक्षित आणि अज्ञानी राहिल. समाजाच्या समतोल विकासासाठी स्त्रीयांचे शिक्षण महत्वाचे आहे. असे त्यांचे मत होते.[१]

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार: शिक्षणातून समाज क्रांती

महात्मा ज्योतिबा फुले यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या गुरुस्थानी मानीत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ज्योतिबांचा शिक्षण संदेश गिरवित कायम ठेवला.आणि शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा असा संदेश दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रचंड प्रमाणात वाचन, मनन , चिंतन केले. आपले विचार आपल्या ओजस्वी वाणीतून लोकांसमोर ठेवले. त्यांचे विचार लोकांना पटत होते. स्वाभाविकच त्यांना प्रचंड अनुयायी वर्ग लाभला. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाची निर्मिती करीत असतांना त्यांनी स्त्रीया व शूद्रातीशद्रांच्या शिक्षणासंबंधी, विकासासंबंधी अनेक तरतुदी करुन ठेवल्या. डॉ.बाबासाहेबांच्या मते," स्त्रीया व शूद्रातीशूद्र हे शिक्षण घेतल्यानंतर वाचू लागतील, वाचल्यामुळे त्यांना हिंदू धर्मातील अनेक बाबींचा उलगडा होईल, हिंदु धर्माने स्त्रीया व शूद्रातीशूद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार का नाकारला होता त्याचा शोध लागेल आणि तो शोध लागल्यामुळे स्त्रीया व शूद्रातीशूद्र हिंदू धर्मातील गुलामी ठोकरुन देतील. देव, दैव, धर्म या संकल्पनेतून स्वतःची मुक्तता करुन घेत विज्ञानवादी, बुद्धीप्रामाण्यवादी होत स्वतःच्या व समाजाच्या विकासाचा मार्ग सुकर करतील" शिक्षणाच्या बाबतीत त्यांचे सूत्र हे 'शिक्षणातून समाजक्रांती' असे होते व अज्ञान दूर करुन विकासाचा मार्ग वृद्धींगत करणारे ठरले आहे.[२]

## स्त्री शिक्षणाने समाजाची प्रगती साध्य होण्यास मदत :

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आणि भारताने लोकशाही समाजव्यवस्था स्विकारल्यानंतर महाराष्ट्रातील स्त्रीया व अब्राम्हणांना मोठया प्रमाणात शिक्षणाची संधी मिळाली. त्यामुळे त्यांना आपल्या अस्मितेची आणि अस्तित्वाची जाणीव झाली. या जाणीवेमधुन संवैधानिक व नैसर्गिक हक्क अधिकाराची मागणी होऊ लागली. महाराष्ट्रातील आज सर्व आघाडयांवर पुरुषांच्या बरोबरीने सर्वशक्तीनिशी स्त्रीया दिसून येण्याचे रहस्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसूत्रातच दडलेले दिसते. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा पुरेपुर उपयोग करीत महाराष्ट्रातील स्त्रीयांनी स्वतःच्या अस्तित्वाचा लढा पुकारलेला दिसून येतो. त्यामागे सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे यांच्या सारख्या अद्वितीय महिलांच्या देखील प्रेरणा आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर केवळ दलितांचेच नेते नव्हते तर त्यांनी समग्र मानवजातीच्या कल्याणासाठी आपले आयुष्य वेचले होते. पारंपारिक धर्मग्रंथांमुळे स्त्रीयांची अवस्था दयनीय झाली होती. त्यांना शिक्षण धेण्याचा अधिकार नाकारला गेला होता. ही गोष्ट बाबासाहेबांच्या लक्षात आली या संदर्भात महात्मा फुले यांचे मत असे होते की, "मानवाला बुद्धीचे वरदान आहे, स्त्री-पुरुषांच्या बुद्धीमध्ये कमी जास्त काही-नाही जगातील सर्व धर्मग्रंथ पुरुषांनीच लिहिली आहेत त्यांनी स्त्रीयांचे नैसर्गिक मानवी हक्क काढुन घेतले. व स्त्रीला गुलाम बनविले वास्तविक स्त्री पुरुषांपेक्षा श्रेष्ठ आहे. आपत्य प्रेमाचे वरदान निसर्गतः स्त्रीला मिळाले आहे. याबाबत ती पुरुषांपेक्षा श्रेष्ठ आहे." मात्र आजही समाजमन महिलांना बरोबरीचे स्थान देण्यास नकारात्मक आढळते. स्त्रीयांवर धर्माव्या नावाने आजही धर्मगुरु अन्याय करीत असल्याचे दिसते. सक्तीचा बुरखा, नोकरी सोडून चार भिंतीच्या आड घरी बसणे असे न करणाऱ्या स्त्रीयांना धार्मिक स्थळांमध्ये प्रवेशबंदी, त्यांचे कित्येक वर्षाचे विवाह मोडण्याची, मुलाबाळांपासून त्यांची ताटातुट करण्याची धमकी त्यांना देण्यात येते. राज्यघटनेने मिळणाऱ्या कोणत्याही हक्काचा उपभोग या स्त्रीयांना का घेता येऊ नये ? वास्तविक स्त्रीयांची प्रतिभा जेवढी फुलेल, त्यांच्या अंतर्शक्ती जेवढया साकार होतील तेवढे मानवजातीचे कल्याण होणार आहे. समाजाचा अर्धाभाग असणाऱ्या स्त्रीयांची कार्यक्षमता सर्जनशीलता मारुन टाकण्यात केवळ स्त्रीयांची हानी नसून संपूर्ण मानवजातीची हानी होत आहे. स्त्रीयांची गुणवत्ता वाढली तर पुरुषांना पर्यायाने समाजास त्याचा निश्चितच लाभ होईल.[३]

## स्त्री शिक्षणासाठी सभा परिषदांमधुन प्रबोधन :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांच्या उद्धारासाठी अतिशय महत्वपूर्ण कार्य केले आहे उच्चशिक्षणपूर्ण झाल्या नंतर इ.स.१९२० मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारतात आले. त्या वेळी कामाठीपुरा, सातरस्ता, परळ येथील दगडीचाळ, लोखंडीचाळ, घोडयाच्या पागेतील अस्पृश्य वस्त्यांमधुन लोकजागृती साठी त्यांनी या सर्व ठिकाणी भाषणे दिली. स्त्रीयांनी देखील भाषणे ऐकावीत असे त्यांना वाटत होते. आपल्या भगीनींनी शिक्षण घ्यावे, उच्चवर्गीय स्त्रीयांप्रमाणे दिसावे, वागावे, स्वाभिमानाने जगावे अशा प्रकारचे विचार ते आपल्या भाषणातून मांडत होते. स्त्रीयांच्या प्रगतीवरुन समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करीत असत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अगदी विद्यार्थी दशेपासून स्त्री शिक्षणाचा आग्रह धराला होता. औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालय स्थापन करुन त्यात त्यांनी मुलींना प्रवेश दिला. या महाविद्यालयात जास्त मुलींना येता यावे म्हणुन महाविद्यालय ते शहर अशी बस सेवाही उपलब्ध करुन दिली. स्त्रीयांच्या प्रगतीच्या आड त्यांची लवकर लग्ने येतात हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बरोबर हेरले होते. म्हणुनच लग्ने लवकर करुन वैवाहिक जीवन त्यांच्यावर लादू नका असे ते नेहमी सांगत असत.[४]

## स्त्रीयांवरील अत्याचाराला पायबंद घालण्यासाठी शिक्षण आवश्यक :

महाड संग्राम परिषदेच्या वेळी त्यांनी पाच हजार स्त्रीयांची सभा घेतली या सभेत त्यांनी महिलांना उद्देशून जो उपदेश केला तो अतिशय सोपा, साधा परंतू सारगर्भ अशा प्रकारचा होता. एक महान पंडित आणि विद्वान सोपे बोलू शकत नाही हा समज त्यांनी खोटा ठरविला होता. महिलांच्या शिक्षणाबाबत ते म्हणतात,"कोणतीही अमंगल गोष्ट होऊ देऊ नका, मेलेल्या जनावरांचे मांस खाणे बंद करा. दारुबाज नवऱ्यांना,भावांना,अथवा मुलांना जेवायला घालू नका. मुलींना शिक्षण दया. ज्ञान व विद्या या गोष्टी स्त्रीयांनाही आवश्यक आहेत. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा ज्याचा तिन्ही लोकी झेंडा' अशी महत्वाकांक्षा ठेवून जगा" अशा प्रकारचे मौलिक विचार त्यांनी पेरले होते.[५] डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे दलित परिषदेचे आयोजन केले होते या सभेस २० ते २२ हजार स्त्रीया उपस्थित होत्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्त्रीयांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की,स्त्रीयांची जेवढी प्रगती झाली तेवढी समाजाची प्रगती होते. याचा अर्थ समाजाचा विकास हा स्त्रीच्या विकासावर आवलंबून आहे. म्हणुन स्त्रीयांनी साक्षर झाले पाहिजे. स्त्री साक्षर झाली तर तिच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचारापासून मुक्तता करण्यासाठी ती सज्ज होईल. मात्र सनातनी मंडळीचा स्त्री शिक्षणास विरोध होता. स्त्रीयांनी शिक्षण धेणे हे कुठल्याही धर्मशास्त्रीय दृष्टया निशिब्ध अशा प्रकारची परिवर्तनवादी विचार सरणी १९व्या शतकात पुढे येऊ लागली म्हणुन समाज जागृती साठी शिक्षण हे प्रभावी साधन आहे हे जाणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज प्रबोधनाचे कार्य केले [६]

## शिक्षणाला नीतीमत्तेची जोड देण्याची आवश्यकता :

भारतीय समाजातील स्त्रीयांची भावनिक, मानसिक, शारीरिक जीवनाची गुणवत्ता सुधारणेचे उद्दिष्ट ठेवून त्यासाठी जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, मानसिक,सांस्कृतिक तसेच राजकिय अशा सर्वच क्षेत्रात स्त्रीयांसाठी समानता प्रस्थापित करुन त्यांचे समाजातील स्थान व दर्जा वाढविण्यासाठी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार बाबासाहेबांनी केला होता. त्यासाठी त्यांनी अखिल भारतीय महिला परिषद आयोजित करुन त्यात स्त्री शिक्षणावर भर देणारे ठराव मांडण्यात येत असत. इ.स.१९२७ मध्ये अखिल भारतीय बहिष्कृत हितकारीनी परिषदेत पुढील प्रमाणे ठराव मांडण्यात आला तो असा की, ज्या ठिकाणी शाळा असेल तेथील लोकांनी मुलांबरोबर मुलींना शिक्षण दिलेच पाहिजे. अशी पंचांनी ताकीद दयावी दि.२७-१२-१९२७ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपला अध्यक्षिय भाषणातून स्त्रीयांना उद्देशून म्हटले,"मुलींनाही शिक्षण दिलेच पाहिजे. ज्ञान आणि विज्ञान या गोष्टी काही पुरुषांसाठीच नाहीत त्या स्त्रीयांनाही आवश्यक आहेत. याच भाषणात ते पुढे असेही म्हणतात की आपली पुढील पिढी जर आपणास सुधारावयाची असेल तर तुम्ही मुलींना शिक्षण दिल्या शिवाय राहू नका. 'खाण तशी माती' असा निसर्ग नियमांचा संकेत देऊन स्त्री शिक्षणाचा विचार त्यांनी जनतेला दिला होता. अखिल भारतीय दलित महिला परिषदेला संबोधित करतांना बाबासाहेब म्हणाले होते की तुम्ही सर्व प्रथम शिक्षित व्हा, आपल्या मुला-मुलींना शिकवा त्यामुळे देशाचा विकास होईल, तुमच्या अस्मितेचा देखील विकास होईल.तुम्ही पण माणुस आहात अशी तुम्हाला ओळख होईल. कारण शिक्षण वाघीणीचे दूध आहे ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. स्त्री शिक्षणाचे महत्व पटवितांना बाबासाहेब पुढे म्हणतात, एक पुरुष शिकला तर एक व्यक्ती सुधारते पण एक स्त्री शिक्षित झाली तर संपूर्ण कुटुंबाची सुधारणा होते. यात माहेर आणि सासरचा देखील समावेश होतो. स्त्री शिक्षणाचा विचार करतांना त्यांना त्यांचे घर, त्यांची मुले आणि संसार हा निटनेटका चालवू शकतील इतपत शिक्षण देणे आवश्यक आहे."[७]

स्त्रीयांच्या उच्चशिक्षणाविषयी डॉ.बाबाबसाहेबांचे विचार असे होते की मुलींना उच्च शिक्षण दिले जाईल ते व्यवहारोपयोगी असले पाहिजे. जीवनाला उपयुक्त असावे, राष्ट्रपयोगी असले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. शिक्षणाला नीतीमत्तेची जोड असेल तर उत्तम चारित्र्य असलेले व्यक्तीमत्व घडते याची जाणिव बाबासाहेबांनी वेळोवेळी करुन दिली होती. तसेच त्यांनी आपले शिक्षणविषयक विचार मांडतांना याबाबतीत स्त्री पुरुष असा फरक केला नाही. समाज उन्नतीच्या गाडयाचे स्त्री हे दुसरे चाक असून पुरुषाने या चाकाला आपल्या बरोबरीने शिक्षणाचा लाभ मिळवून दिला पाहिजे.[८] तरच समाजोन्नतीचा गाडा व्यवस्थितपणे चालू शकेल आणि इच्छित ठिकाणी व्यवस्थितपणे पोहचू शकेल असे विचार त्यांनी मांडल्याचे दिसून येतात.

## निष्कर्ष :

महात्मा फुले व बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक सुधारणेची व स्त्री शिक्षणाची दिव्यपरंपरा महाराष्ट्रास लाभली. त्याचा लाभ महाराष्ट्रातील स्त्री चळवळीला लाभलेला दिसून येतो डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक समाजसुधारक होते. तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचाराची दखल त्यानी घेतलेली होती. त्या विरुद्ध त्यांनी लढा दिला होता. त्यासाठी ते सतत संघर्ष करीत राहिले. स्त्रीयांना पायातली वाहन समजल्या जाणाऱ्या स्त्रीयांना सवातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात स्वत:चा हक्क मिळवून देण्यासाठी ते सतत संघर्षरत राहिले. स्त्रीयांनी आपली सामाजिक हालाखीची परिस्थिती सुधारावी यासाठी परंपरागत विचारांचा व रुढी रीतींचा त्याग करुन पुढे यावें. स्त्रीयांनी शिक्षण

ध्यावे व स्वत:च्या पायावर उभे रहावे आणि मानव म्हणुन अभिमानाने जगावे. यासाठीच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणातून, लेखांमधुन, ग्रंथलेखन करुन प्रबोधन केले आहे. त्याचा निश्चितच भारतीय समाजातील स्त्री वर्गाला लाभ झालेला दिसून येतो.

## संदर्भ ग्रंथ सूची

१) विद्युत भागवत (डॉ.) **स्त्रीमुक्ती प्रवक्ते** लेख प्रा.हरी नरके प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन,मुंबई २००६
२) भास्कर लक्ष्मण भोळे, **भारतीय साहित्याचे निर्माते**, महात्मा ज्योतिराव फुले साहित्य अकादमी ,नवी दिल्ली २००४
३) संजय बरडे (डॉ.), **भारतरत्न डॉ.बाबासाहेबांचे शैक्षणिक चिंतन,** संदेश प्रकाशन दिल्ली २०१०
४) तत्रैव
५) दै. **लोकराज्य** एप्रिल २०१५ पृ.क्र.१५
६) धनंजय किर **, डॉ.बाबासाहेब आंबेडकर**, पॉप्युलर प्रकाशन पुणे, २०१४
७) प्रा.शमसुद्दिन तांबोळी, प्रा.बेनझीर तांबोळी, **प्रभावशाली शिक्षण तज्ञ,** डायमंड पब्लिकेशन्स,पुणे २००९
८) संजय बरडे (डॉ.), **उपरोक्त**